# मंत्रिपरिषद निर्णय

## ३० ऑगस्ट २०१६

## ( बैठक क्र. ९८ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | **एसीबीमार्फत चौकशी सुरू असलेल्या १४ पाटबंधारे प्रकल्पांच्या ९४ निविदा रद्द** | जलसंपदा |
| २ | **गोसीखुर्दच्या १८ हजार ४९४ कोटींच्या प्रस्तावास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय** | जलसंपदा |
| ३ | शेतकऱ्यांना शासनाचा दिलासा<br>**राज्यातील कांदा उत्पादकांना क्विंटलमागे १०० रुपये अनुदान** | पणन |
| ४ | कायम विना अनुदानित शाळांचा प्रश्न मार्गी<br>**खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांना सरसकट २० टक्के अनुदान देणार** | शालेय शिक्षण |
| ५ | **विद्यापीठांच्या निवडणुका ३१ ऑगस्ट २०१७ पर्यंत पुढे ढकलण्यासाठीचा अध्यादेश काढण्यास मान्यता** | उच्च व तंत्रशिक्षण |

**एसीबीमार्फत चौकशी सुरू असलेल्या**
**१४ पाटबंधारे प्रकल्पांच्या ९४ निविदा रद्द**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत (एसीबी) चौकशी सुरू असलेल्या राज्यातील १४ पाटबंधारे प्रकल्पांच्या ९४ निविदा रद्द करण्याच्या प्रस्तावास आज झालेल्या मंत्रिपरिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. सर्व कायदेशिर बाबींची पूर्तता करून निविदा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला असून तो प्रकल्पांच्या निविदानिहाय गुणवत्तेनुसार घेण्यास जलसंपदा विभागास प्राधिकृत करण्यात आले आहे. यामुळे राज्यातील विविध प्रकल्पांची कामे कालबद्ध मुदतीत पूर्ण करून शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळेल.

कोकण विभागातील १२, नाशिक जिल्ह्यातील एक आणि विदर्भातील गोसीखुर्द प्रकल्पातील ८१ अशा एकूण ९४ निविदांचा या प्रस्तावात समावेश आहे. कोकणातील एसीबीमार्फत उघड चौकशी चालू असणाऱ्या १२ प्रकल्पांमधील बहुतांशी प्रकरणी भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन हस्तांतरण झालेले नाही. त्यामध्ये बाळगंगा, काळू, शिरशिंगे, गडगडी, शीळ, शाई, सुसरी, गडनदी, कोंडाणे, चणेरा, जामदा आणि काळ या १२ प्रकल्पांचा समावेश आहे. तसेच गोदावरी-मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत नाशिक जिल्ह्यातील किकवी प्रकल्पाची देखील निविदा यात समाविष्ट आहे.

गोसीखुर्द प्रकल्पातील एसीबीमार्फत उघड चौकशी सुरू असलेल्या निविदांचा देखील यात समावेश आहे. वडनेरे समितीने गोसीखुर्द प्रकल्पाच्या निविदा निश्चितीकरणातील काही अनियमितता निदर्शनास आणल्या होत्या. वडनेरे समितीने आक्षेप घेतलेल्या निविदांतर्गत उर्वरित कामाची किंमत एक कोटीपेक्षा जास्त असणाऱ्या निविदा रद्द होतील. अशा निविदा रद्द करताना इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट १९७२ मधील तरतुदींचा आधार घेण्यात येईल. तसेच यानुषंगाने विधी विभागाच्या सल्ल्यानुसार रद्द करावयाच्या निविदेबाबत गुणवत्तेच्या आधारे व परिस्थितीनुरूप करारातील यथायोग्य कलमांन्वये त्या रद्द करण्यात येणार आहेत. त्यानुसार गोसीखुर्द प्रकल्पातील ८१ निविदा रद्द करण्यात येणार असून नवीन निविदा बोलावून त्यांची कामे मार्गी लावण्यात येणार आहेत.

गोसीखुर्द प्रकल्पातील वडनेरे समितीने आक्षेप घेतलेल्या तथापि ज्यांच्या उर्वरित कामाची किंमत एक कोटीपेक्षा कमी आहे व जे कंत्राटदार उर्वरित काम दोन महिन्यात करू शकतील अशी अधीक्षक अभियंत्यांची खात्री आहे, अशी कामे अस्तित्वात असलेल्या निविदेतूनच करण्यात येणार आहेत. कारण या निविदा रद्द करून फेर निविदा काढण्यात जास्त वेळ जाण्याची शक्यता आहे.

त्याचप्रमाणे या प्रकल्पासंबंधातील अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशा सुरू आहेत. शासनाने प्रकल्पांना निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच भूसंपादन कामास गती दिली असली तरीही विविध चौकशांमुळे कामात आवश्यक प्रगती दिसून येत नव्हती. पाटबंधारे प्रकल्पांवर करण्यात आलेली गुंतवणूक विचारात घेता प्रकल्पांचे काम अर्धवट ठेवून शेतकऱ्यांना दीर्घकाळ लाभापासून वंचित ठेवणे योग्य नव्हते.

-----०-----

## गोसीखुर्दच्या १८ हजार ४९४ कोटींच्या प्रस्तावास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय

भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द राष्ट्रीय जल प्रकल्पाच्या १८४९४.५७ कोटी रुपयांच्या प्रस्तावास तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिपरिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाचा या प्रकल्पाशी संबंधित सध्या सुरू असलेल्या कोणत्याही चौकशांवर परिणाम होणार नाही.

भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यात वैनगंगा नदीवर बांधण्यात येत असलेला गोसीखुर्द हा राज्यातील एकमेव राष्ट्रीय प्रकल्प असून त्यास केंद्र शासनाकडून ९० टक्के अर्थसहाय्य प्राप्त होत आहे. पूर्व विदर्भातील या सर्वात मोठ्या बहुउद्देशीय प्रकल्पाद्वारे सिंचन सुविधेबरोबरच पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, औद्योगिक पाणीपुरवठा, मत्स्यव्यवसाय व जलविद्युत निर्मिती होणार आहे. या प्रकल्पामुळे पूर्व विदर्भातील नागपूर, चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यातील एकूण १ लाख ९० हजार हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार असून त्यापासून २ लाख ५० हजार ८०० हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

गोसीखुर्द प्रकल्पास यापूर्वी २००५-०६ यावर्षाच्या दरसूचीच्या आधारावर ५६५९.१० कोटी रुपये किंमतीस १ नोव्हेंबर २००७ रोजी द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली होती. ढोबळ मानाने बांधकामाच्या दरम्यान भूसंपादन व पुनर्वसन विशेष पॅकेज खर्च (विशेषत: नवीन भूसंपादन कायद्यान्वये), दरसूची, जादा दराच्या निविदांची स्वीकृती, संकल्पचित्रातील बदल, अपुऱ्या तरतुदी व इतर अनुषंगिक खर्चात झालेल्या वाढीमुळे प्रकल्प किंमतीत वाढ झाली. २००९ पासून सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची मागणी करण्यात येत होती. परंतु, मागील सरकारने जुन्याच प्रशासकीय मान्यतेच्या आधारे प्रकल्पाची कामे सुरू ठेवली होती. त्यामुळे काही कामांवर आक्षेप उपस्थित केले जात होते. चितळे समितीसह अन्य चौकशी समित्यांनी आपल्या अहवालात जे जे निकष ठरवून दिले, त्यानुसार सुधारित प्रशासकीय मान्यता द्यावी, अशी सूचना करण्यात आल्याने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव दिला होता.

एकूण प्रकल्प किंमतीतील वाढ १२,८३५.४८ कोटी रुपयांची आहे. त्यात निव्वळ दरवाढीमुळे ३५४४.९५ कोटी, भूसंपादन दरातील वाढीमुळे १९७३.७९ कोटी, संकल्पचित्रातील बदल १६४६.७२ कोटी, द्वितीय सुप्रमा नंतर झालेल्या अतिरिक्त भौतिक प्रकल्प घटकांमुळे झालेली वाढ ३०६७.०२ कोटी, पुनर्वसन पॅकेज, एनपीव्ही, इत्यादी कारणांमुळे १४९०.५८ कोटी आणि आस्थापना व अनुषंगिक खर्चासाठी ८६४.६३ कोटी, मागील काळात दिलेल्या जादा दराच्या निविदा इत्यादी असा एकूण १२८३५.४८ कोटी खर्च वाढला आहे.

बांधकामाची सद्यस्थिती, किंमतवाढीची कारणमिमांसा, प्रकल्पातील कामाच्या अनुषंगाने झालेल्या अनियमिततेबाबत शासनाने नियुक्त केलेली मेंढीगिरी समिती, वडनेरे समिती तसेच सिंचन विषयक विशेष चौकशी समितीने नोंदविलेले आक्षेप, त्याअनुषंगाने शासनाने केलेली कार्यवाही यांचा परामर्श घेऊन पूर्व विदर्भास वरदान ठरणाऱ्या या प्रकल्पाला मंत्रिपरिषदेने तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता दिली.

मंत्रिमंडळाने ही मान्यता पुढील अटींच्या अधीन राहून दिली आहे. मेंढीगिरी समिती व वडनेरे समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने सद्या चालू असलेल्या विभागीय चौकशीची कार्यवाही तशीच पुढे चालू ठेवावी. सिंचनविषयक विशेष चौकशी समितीने निदर्शनास आणलेल्या अनियमितता व त्या अनुषंगाने १४

जून २०१४ रोजी मंत्रिमंडळाने मान्य केलेल्या कार्यपालन अहवालानुसार अपेक्षित कार्यवाही करण्यात यावी. लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत आदेशित केलेल्या चौकशा तशाच पुढे चालू ठेवाव्यात. घोडाझरी शाखा कालवा व मोखाबर्डी उपसा सिंचन योजना या दोन प्रकल्प घटकातील किंमतवाढ तुलनेत जास्त असल्याने त्यांचे तांत्रिक परीक्षण (Technical Audit) करण्यात यावे. तांत्रिक परीक्षणाच्या (Technical Audit) निष्कर्षानुसार जबाबदारी निश्चितीची पुढील कार्यवाही करावी. उपलब्ध निधीचे Thin Sprading टाळण्याच्या दृष्टीने राज्य तांत्रिक सल्लागार समितीचा अहवाल विचारात घेऊन प्रकल्प घटकांच्या बांधकामावरील गुंतवणूकीचा प्राधान्यक्रम निश्चित करावा.

या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या आधारे केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. केंद्रीय जल आयोगाकडून प्रस्तावाची तांत्रिक व आर्थिक तरतुदीची छाननी झाल्यानंतर केंद्रीय जल आयोगाने निश्चित केलेल्या किंमतीस केंद्र शासनाबरोबर अर्थसहाय्य मिळण्याबाबत सुधारित सामंजस्य करार करण्यात येणार आहे. जून २०१९ पर्यंत गोसीखुर्द प्रकल्पाची कामे पूर्ण करण्यात येणार असून यापुढे दिलेल्या मुदतीत वाढ होणार नाही.

-----o-----

पणन विभाग

<u>शेतकऱ्यांना शासनाचा दिलासा</u>

## राज्यातील कांदा उत्पादकांना क्विंटलमागे १०० रुपये अनुदान

मोठ्या प्रमाणातील उत्पादनामुळे कांद्याच्या भावात घसरण झाल्याने अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रति क्विंटल १०० रुपये याप्रमाणे अनुदान देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिपरिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. जुलै व ऑगस्ट २०१६ या महिन्यामध्ये राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीत कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना हे अनुदान देण्यात येणार असून एका शेतकऱ्यास जास्तीत जास्त २०० क्विंटलपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे.

यंदा राज्यात कांद्याच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याने दरात घसरण झाली आहे. त्यामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मदत करण्याचा विचार शासनस्तरावर सुरु होता. त्यानुसार आज या शेतकऱ्यांना मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये १ जुलै ते ३१ ऑगस्ट २०१६ या कालावधीत कांद्याची विक्री केलेले शेतकरी या मदतीस पात्र ठरणार आहेत. प्रति क्विंटल १०० रुपये या प्रमाणे एका शेतकऱ्यास जास्तीत जास्त २०० क्विंटल मर्यादेत हे अनुदान देण्यात येणार आहे. मुंबई बाजार समिती वगळता राज्यातील इतर सर्व बाजार समित्यांसाठी हे अनुदान लागू राहील. कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी या योजनेच्या अनुदानासाठी कांदा विक्रीपट्टी, ७/१२ उतारा, बँक बचत खाते क्रमांक आदी तपशिलासह संबंधित बाजार समितीकडे अर्ज करणे आवश्यक आहे. परराज्यातील आवक झालेल्या व व्यापाऱ्यांच्या कांद्याला ही योजना लागू नाही. २०१५-१६ या वर्षात राज्यात ७४.२८ लक्ष मे.टन कांद्याचे उत्पादन झाले आहे. गेल्या वर्षी हेच उत्पादन ५६.८९ लक्ष मे.टन इतके होते.

-----o-----

कायम विना अनुदानित शाळांचा प्रश्न मार्गी

**खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांना**

**सरसकट २० टक्के अनुदान देणार**

राज्यातील विनाअनुदान तत्त्वावर तसेच कायम विनाअनुदान तत्त्वावर परवानगी दिलेल्या व मुल्यांकनादरम्यान अनुदानास पात्र ठरलेल्या मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांना द्यावयाच्या अनुदान सुत्रामध्ये बदल करुन त्यांना सरसकट २० टक्क्यांप्रमाणे अनुदान देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिपरिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. जून २००९ पासून प्रलंबित असलेला कायम विना अनुदानित शाळांचा प्रश्न आजच्या निर्णयामुळे अखेर सोडविण्यात आला. या निर्णयाचा लाभ १९ हजार २४७ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना होणार आहे.

राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांना द्यावयाच्या अनुदान सुत्रात यापूर्वी वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. कायम हा शब्द २० जुलै २००९ रोजी वगळल्यानंतर शाळा मुल्यांकनाच्या विहित अटी, शर्ती व निकषानुसार अनुदान देण्याचा निर्णय तत्कालीन सरकारने घेतला होता. मात्र, २००८ ते २०१६ या आठ वर्षांच्या कालावधीत या शाळांमधील शिक्षकांच्या पदरी प्रत्यक्षात काहीच पडले नव्हते. गेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्र्यांनी तर शालेय शिक्षण मंत्र्यांनी नुकत्याच आटोपलेल्या पावसाळी अधिवेशनात गणेशोत्सवापूर्वी याबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते.

आजच्या निर्णयानुसार २००५ पूर्वी विनाअनुदानित तसेच कायम विनाअनुदानित तत्त्वावर परवानगी देण्यात आलेल्या तसेच २० जुलै २००९ च्या शासन निर्णयानुसार कायम हा शब्द वगळण्यात आला आहे. मुल्यांकनात निर्देशित करण्यात आलेले सर्व निकष, अटी, शर्ती यांचे पालन करुन अनुदानास पात्र ठरलेल्या शाळांना शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत २० टक्क्यांप्रमाणे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यातील आर्थिक संसाधने, गरजा तसेच प्राधान्यक्रम यांचा विचार करुन पुढील अनुदानाबाबत निर्णय घेण्यात येईल.

यापूर्वी राज्यात देण्यात येत असलेल्या टप्पा अनुदानास ज्या शाळा पात्र ठरल्या परंतु , ज्यांना अद्याप अनुदान वितरित न करण्यात आलेल्या शाळांनाही आता २० टक्के अनुदानाच्या निर्णयानुसार अनुदान मिळणार आहे. गैरव्यवहारांना आळा बसण्यासाठी २०१५-१६ च्या संचमान्यतेनुसार मंजुर असलेल्या पदांनाच अनुदान देण्यात येणार आहे. याशिवाय शिक्षक विद्यार्थांसाठी बायोमेट्रिक प्रणाली असणे तसेच शिक्षकांचे आधारकार्ड आणि वैयक्तिक मान्यतेचे आदेश सरल प्रणालीत भरणे या निर्णयानुसार अनुदान प्राप्त करण्यासाठी आवश्यक करण्यात आले आहेत.

या शाळांची विद्यार्थी संख्या ग्राहय धरतांना जिल्हा शैक्षणिक प्रणालीवरील(युडीआय) क्रमांक आणि विदयार्थ्यांच्या आधारकार्ड क्रमांकांचा आधार घेऊन विदयार्थी संख्या निश्चित करण्यात येणार आहे. हे सर्व निकष पुर्ण करणा-या तसेच अनुदानास पात्र असलेल्या शाळांना हा निर्णय लागु झाल्यानंतरच्या महिन्यापासून अनुदान वितरित करण्यात येईल. शासनाच्या या निर्णयामुळे १६२८ शाळा व २४५२ तुकड्यांसह १९,२४७ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. या २० टक्के अनुदानामुळे शासनाच्या तिजोरीवर १४३ कोटींचा आर्थिक भार जास्तीचा पडणार आहे.

-----o-----

**विद्यापीठांच्या निवडणुका ३१ ऑगस्ट २०१७ पर्यंत**
**पुढे ढकलण्यासाठीचा अध्यादेश काढण्यास मान्यता**

विद्यापीठांच्या विविध प्राधिकरणांच्या निवडणुका घेण्याची मुदत तात्पुरत्या स्वरुपात ३१ ऑगस्ट २०१७ पर्यंत किंवा नवीन कायद्यांतर्गत प्राधिकरणे व मंडळे यांची स्थापना यापैकी अगोदरच्या तारखेपर्यंत पुढे ढकलण्यासाठीचा अध्यादेश काढण्यास मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिपरिषदेच्या बैठकीत घेण्यात आला.

नवीन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम तत्काळ अंमलात आणण्याबाबत कार्यवाही सुरू असून अधिनियमामध्ये बऱ्याच सुधारणा प्रस्तावित केल्या आहेत. त्यामध्ये सोल, व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषद यांची निवड पद्धती व रचना यामध्ये बदल सूचविले आहेत. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ४२(१) मध्ये विविध प्राधिकरणांच्या सदस्यांच्या मुदतीची तरतूद आहे. मात्र, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अस्तित्वात आलेला नसल्याने विद्यापीठांच्या विविध प्राधिकरणाच्या निवडणुका तात्पुरत्या स्वरुपात पुढे ढकलण्यासाठी २०१५ मध्ये Maharashtra Universities (Temporary Postponement of Elections of members of University Authorities and Other Bodies) Act २०१५ असा कायदा करण्यात आला होता. या कायद्यान्वये अकृषी विद्यापीठांमध्ये विविध प्राधिकरणांच्या निवडणुका न घेण्याची निश्चित करण्यात आलेली मुदत ३१ ऑगस्ट २०१६ रोजी संपुष्टात येत आहे. त्यामुळे ही तारिख अजून एक वर्ष पुढे वाढविण्यासाठी अध्यादेश काढण्यास आज मान्यता देण्यात आली.

-----०-----